# बालकाच्या वर्तन व परिवर्तनातील त्यांची भूमिका

## १ पालकांची भूमिका

आई-वडील हे बालकाचे पहिले गुरू असतात आणि काही धडे हे इतरांनी देणं हे तितकेसं सोपं नसतं. बालकाला सर्वांत महत्त्वाचा सल्ला देणं हे आई-वडिलांचं कर्तव्य असतं आणि तो म्हणजे त्याच्या शरीराची त्याच्याशी ओळख आणि त्याचे कार्य जैविक अर्थापुरतं शरीरज्ञान मर्यादित राहता कामा नये. त्याचे इतरांसोबतचे नाते व नात्यांमधल्या मर्यादांचे पालन करणे या गोष्टीचे अवलोकन करणे व सांभाळण्यास सांगणे.

## २ इतरांची भूमिका


इतरांनी आपल्या बालकांशी कसे वागावे हे जरी आपण इतरांना सांगू शकत नसलो तरी आपल्या बालकाने समोरील व्यक्तीसोबत कसे वागावे हे सागूं शकतो. विस्तृत लैंगिक अत्याचाराची दखल पोक्सो कायद्याने घेतली आहे याची जाणीव इतरांनी घेणे गरजेचे आहे. इतरांच्या बाबतीत जे आपण करतो ते आपल्या बालकांच्या बाबतीत ही घडू शकेल याची जाणीव इतरांनी ठेवायलाच हवी.

## ३ काही महत्त्वाच्या सूचना

- बालकांना शिकवताना आत्मविश्वासाने सांगा.
- लघवी करण्यासाठी शिश्न असतं,
- बाळाला दूध पाजण्यासाठी स्तने असतात.
- आपण सांगतो की उचल्यासाठी हात चालण्यासाठी पाय असतात तसेच इतर अवयवांबद्दल बोला.
- अनावश्यक लज्जा न बाळगता एकदा का तुम्ही तुमच्या बालकां सोबत बोलायला सुरुवात केली तर भविष्यातला संवाद आपोआप मोकळा होतो.

# बालकाच्या वर्तन व परिवर्तनातील इशारा देणाऱ्या खुणा

- बालकाला दचकवणारी स्वप्ने पडू लागतात, झोपेची समस्या उद्भवते.
- काही वेळा बालक विचलित होतात किंवा दुरावा निर्माण होतो.
- खाण्याच्या सवयींमध्ये बदल, खायला नकार देतं किंवा भूक लक्षणीयरीत्या कमी होते.
- लैंगिक किंवा भीतीदायक प्रतिमांचे लेखन,चित्रण किंवा स्वप्न पडतात.
- काही लोक किंवा स्थळांबद्दल  अचानकपणे भीती उत्पन्न होते.
- अकारण हातात पैसे, खेळणी किंवा इतर भेटवस्तू दिसू लागतात.
- स्वतः किंवा स्वतःचं शरीर गलिच्छ, वाईट असल्याचे वाटू लागते.
- प्रौढांप्रमाणे लैंगिक वर्तन, भाषा आणि माहिती बालकास दिसते.
- स्वतःला इजा करुन घेणे (कापणे, भाजणे).
- अपुरी व्यक्तिगत स्वच्छता.
- नशेचे पदार्थ, मद्याचा वापर.
- आत्महत्येचा प्रयत्न
- जवळीकतेची धास्ती
- खूप खाणे किंवा उपाशी राहणे



## बालकांना मर्यादांची जाणीव करुन द्या.

बालकाला मर्यादांची जाणीवकरुन देतांना त्यांचे पालक फक्त गुप्तांगावरच बोलतात.एक पालक म्हणून तुम्ही हे बालकाला सांगितले पाहिजे, की तुझ्या शरीरावर फक्त तुझाच हक्क आहे आणि व्यक्तिगत स्वातंत्र्यावर भर हवा, केवळ गुप्तांगावर नव्हे, कोणत्याही मोठ्या व्यक्तीला किंवा तुझ्यापेक्षा ताकदवान व्यक्तीला जननेद्रियांना स्पर्श करण्याचा हक्क नाही व त्यांच्या जननेंद्रीयांना



तुला स्पर्श करायला लावण्याचा हक्क नाही व तुझ्या जननेद्रियांचे फोटो व्हिडिओ काढण्याचा हक्क नाही हे सांगितले पाहिजे, तुझे शरीर तुझंच आहे, तुझ्या शरीराला कोणी स्पर्श करायचा किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार तुझाच आहे, हे बालकाला सांगितलं पाहिजे. हात हातात घेणं, मिठी मारणं यालाही नकार देण्याचा अधिकार तुला आहे, हे बालकाला सांगितलं पाहिजे. कुटुंबात वावरतानाही खासगीपणाचे नियम काटेकोर पाळा, कुटुंबातल्या सर्व सदस्यांशी त्याबाबत बोला. शरीरासंदर्भातल्या मर्यादा या वयानुरूप असतात आणि त्या वयानुसार बदलत जातात, हेही लक्षात ठेवा.



### स्पर्शांचे प्रकार

सुरक्षित आणि असुक्षित स्पर्श. संभ्रम निर्माण करणारा स्पर्श कुठला हे ओळखायला बालकाला शिकवा. आईनं बालकाला जवळ घेणं हे अगदी सुरक्षित आहे. विशिष्ट स्पर्श अगदी असुरक्षित असतात जसं, की चुंबन, गुप्तांगाना स्पर्श तो असतो जेव्हा बालकाला नेमकेपणांनं कळत नाही.

## ‘नाही’ म्हणायला शिकवा!

मोठी माणसं काय सांगतात किंवा काय शिकवतात त्याचं अनुकरण करायला आपण बालकांना सांगतो. परंतु सगळीच मोठी माणसं विश्वासार्ह असतातच असे नाही. त्यामुळे बालकाला ‘नाही’ म्हणायला शिकवा. तुम्हाला गैरसोईच्या वाटणाऱ्या पद्धतीनं कोणी तुम्हाला स्पर्श करु पाहत असेल तर, किंवा इतरांच्या अवयवांना तुम्हांला स्पर्श करण्यास सांगत असेल किंवा फोटो घेत असेल तर **‘नाही’** म्हणा. त्रासदायक किंवा अडचणीच्या प्रसंगापासून ताबडतोब दूर जा आणि विश्वासातल्या व्यक्तीला घडल्या प्रकाराची माहिती द्या, हेही बालकाला शिकवा. बालक तुम्हाला जे काही सांगतं त्याच्यावर विश्वास ठेवा. लैंगिक अत्याचाराबद्दल जेव्हा बालक सांगते तेव्हा ते शांतपणे ऐकून घ्या. त्यावर ताबडतोब प्रतिक्रिया देणे जरूरी असेल तरच द्या.



# लैंगिक अत्याचारांची काही लक्षणे



मुलांच्या गुप्तांगावर
सांगता न येणाऱ्या जखमा होणे.



चालताना, बसताना मुलांना
त्रास होणे.



अस्वस्थ झोप आणि कमालीचा
थकवा.



शाळेतली उपस्थिती एकदम
कमी होणे.



मुलांचे वागणे कधी आक्रमक
तर कधी अंग काढून घेणे



धास्तावलेली वर्तणूक जसे
अंथरूण ओले करणे, अंगठा चोखणे.

## लैंगिक अत्याचारांची काही लक्षणे



अचानक अप्रियता, पूर्वी आवडीच्या व्यक्ती,ठिकाणाला ती/तो टाळू लागणे.



पैसे किंवा भेट वस्तूंचा अचानकपणे साठा करण्यास सुरुवात.



स्वतःच्या दिसण्याकडं मुलं खूप लक्ष देऊ लागतात किंवा दुर्लक्ष करतात.

**लैंगिक अत्याचारांची तक्रार करणाऱ्या बालकांकडे लक्ष द्या.**

**बालकांवर विश्वास ठेवा.**

**तू/ती शूर असल्यांचे बालकांना सांगा**

**अत्याचाराला बळी पडण्यात तिची/त्याची काहीच चूक नाही. हे बालकांना सांगा**

## बालकांसाठी पालकांनी हे करावे



एखादी व्यक्ती, जागा, घटना किंवा शारीरिक अस्वस्थतेबद्दल तक्रार बालक घेऊन आलं तर त्याकडं सयंमानं लक्ष द्या.



बालकाला प्रिय असणाऱ्या व्यक्तीशी याबद्दल गांभीर्यानं बोला.




१०९८या चाईल्ड लाईनशी संपर्क साधा



एखादी घटना समजल्याबरोबर तातडीनं बालकाची वैद्यकीय तपासणी होईल याची काळजी घ्या



अत्याचाराची तक्रार जवळच्या पोलिस ठाण्यात त्वरित नोंदवा.



बालकाबरोबर घटनेची किंवा त्याच्या तपशिलांची चर्चा करताना संवेदनशीलता बाळगा

## बालकांसाठी पालकांनी हे टाळावे



बालकाला दोष देणे.



एखादी व्यक्ती, जागा, घटना किंवा शारीरिक अस्वस्थतेबद्दल तक्रार बालक घेऊन आलं तर त्याकडे दुर्लक्ष करणे.



घटनेची नोंद झाल्यानंतर भावनाविवश होणे



जिथे अत्याचार घडला त्याच व्यक्ती किंवा त्याच ठिकाणी बालकाला पुन्हा पाठवणे



इतरांकडून मदत घेण्यापासून बालकाला परावृत्त करणे.



बालकाची ओळख इतरांना सांगणे प्रसिद्धी माध्यमांद्वारे उघड करणे.

## बालकांसाठी पालकांनी हे टाळावे



बालकाला वैद्यकीय सुविधा पुरवण्याकडे दुर्लक्ष करणे.




अत्याचार घडल्याचं समजल्यानंतरही त्याची दखल न घेणे.




पोलिस ठाण्यात अपराधाची तक्रार न नोंदवणे



## मुलांनी स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे ?

- मुलांनो तुम्ही आपल्या शरीराचे मालक आहात. हे शरीर फक्त तुमचेच आहे. कोणालाही तुमच्या शरीराला अपाय करण्याचा अधिकार नाही.
- शरीराची गुप्त अंगे, जी कपड्यांनी झाकलेली असतात. या अंगांना स्वच्छ व निरोगी ठेवण्यासाठी कोणी पाहिले तर ठीक आहे. त्याशिवाय यांना दुसरे कोणी स्पर्श करणे/पाहणे योग्य नाही.
- अल्पवयीन बालकांना मिठीत घेणे,पापी घेणे आवडते. परंतु हे कोणाला सांगू नको अशी धमकी कोणी देत असेल तर याबाबत तुमच्या घरातील मोठ्या माणसांना अवश्य (आई-वडील) सांगा. ज्यांचा तुमच्यावर विश्वास आहे.

हे करा **पालकांसाठी महत्त्वाचे** हे टाळा

## लैंगिक अत्याचार समजल्यानंतर बालकाबरोबरचे वर्तन

**हे करा** बालकाच्या बोलण्याकडे लक्ष द्या, त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवा

**हे टाळा** गुदरलेल्या प्रसंगाबद्दल बालकांनं सांगितल्यानंतर होणं, बालकांकडे दुर्लक्ष करणं बालकाला दोष देणं

**हे करा** तुझ्यावर माझं प्रेम आहे, मी तुझं रक्षण करील, घडलं त्यात तुझी चूक नाही हे त्याला /तिला सांगा

**हे टाळा** जे घडलं ते विसरून जा, बालकाला दोष देणं किंवा झालेल्या अत्याचाराबद्दल बालकाला गप्प बसायला सांगणं

**हे करा** काही वेळापूर्वीच अत्याचार झाला असेल तर बालकाला तातडीनं वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात न्या, जेणेकरुन पुरावे नष्ट होणार नाहीत.

**हे टाळा** काही वेळापूर्वीच अत्याचार झाला असेल तर बालकाला आंघोळ घालणं. त्याचे कपडे आणि इतर महत्त्वाचे पुरावे फेकून देणं.

**हे करा** तिच्या/त्याच्या मानसिक आरोग्यासाठी समुपदेशक किंवा तज्ज्ञ स्वयंसेवी संस्थेचं मार्गदर्शन घेणं. तुम्हाला स्वःला धक्का बसला असेल तर मदत घेणं.

**हे टाळा** बालकावर झालेला आघात किंवा त्याच्या मानसिक आरोग्याकडं दुर्लक्ष करणं. स्वतःच्या मानसिक स्थितीकडं दुर्लक्ष करुन बालकाकडं लक्ष देणं.

**हे करा** घटनेची तक्रार देण्यासाठी नजीकच्या पोलिस ठाण्यात जा.

**हे टाळा** बालकाला पोलिस ठाण्यात घेऊन जाणे

## एफआय आर नोंदवणे

हे करा — सर्व तपशील लिहून घेऊन एफआयआरची प्रत देण्यास पोलिसांना सांगा.

हे टाळा — पोलिसांबरोबरच्या तोंडी संवादावर अवलंबून राहणे.

हे करा — एफआयआर नोंदवल्यानंतर वैद्यकीय तपासणी होतांना बालकाची सोबत करणे.

हे टाळा — बालकाला पोलिसांबरोबर किंवा इतर व्यक्तीबरोबर एकट्याला पाठवणे.

हे करा — जबाब देण्यासाठी बालकाला तयार करणं. बालक अस्वस्थ असेल तर जवाब नोंदवताना तुम्ही सोबत उपस्थित राहणं.

हे टाळा — जबाब नोंदवताना बालकाला पोलिसांसोबत एकटं सोडणं. (बालकाची तशी मागणी असल्याखेरीज)



## पालकांसाठी महत्त्वाचे

### याची खात्री करा

- जबाब घेण्यासाठी पोलिस कधी येणार आहेत याची त्यांनी आगाऊ वर्दी दिली आहे का?
- जबाब तुमच्या घरी किंवा बालकाला जिथं सुरक्षित वाटेल अशाच ठिकाणी नोंदवला गेला पाहिजे.
- जबाब घेण्यासाठी पोलिसांनी गणवेशात येता कामा नये.
- उप-निरीक्षक किंवा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या महिला पोलिस अधिकाऱ्यानेच जबाब नोंदवून घ्यायला हवा.
- लिहून घेतलेला, टंकलिखित केलेला जबाब बालक बोललं तसाच असला पाहिजे.
- विशेष किंवा दिव्यांग बालक असेल तर विशेष तज्ज्ञांचे सहकार्य पोलिसांना मागा.
- जबाब पूर्ण झाल्यानंतर तुम्ही आणि बालकापुढं पोलिसांना तो मोठ्या आवाजात वाचायला लावा. त्यात बदल, सुधारणा करायची असल्यास पोलिसांना सांगा.
- तपास अधिकाऱ्याची माहिती नोंदवून घ्या.



**हे करा** # वैद्यकीय तपासणी **हे टाळा**

## लैंगिक अत्याचार समजल्यानंतर ... केलेली वैद्यकीय तपासणी

**हे करा** वैद्यकीय तपासणी करण्यास सक्षम तपास अधिकाऱ्याकडून डॉक्टरांनी अनुमती घेणे. (कलम १६४ सीआरपीसी १९७३)

**हे टाळा** तपास अधिकाऱ्याकडून अनुमती न घेता डॉक्टरांना वैद्यकीय तपासणी करु देणे.

**हे करा** बालकाच्या पालकाच्या किंवा बालकाच्या विश्वासू उपस्थितीत वैद्यकीय तपासणी होणे. (कलम २(३)) कोणत्याही स्थितीत बालकावर वैद्यकीय तपासणी करणे.

**हे टाळा** बालकाच्या अनुमतीशिवाय डॉक्टरांना वैद्यकीय तपासणी सुरू करू देणे.

**हे करा** पीडित मुलगी असेल तर वैद्यकीय तपासणी स्त्री डॉक्टरांनीच केली पाहिजे. ( कलम २७ (२))

**हे टाळा** डॉक्टरांच्या हाताळणीबाबत बालक असमाधानी असेल तरी वैद्यकीय तपासणी तशीच चालू ठेवणं.

**हे करा** मागील घटनांची नोंद घेतली जात असताना आणि वैद्यकीय तपासणी पूर्ण होईपर्यंत बालकासोबत राहणं. सर्व वैद्यकीय अहवाल आणि वैद्यकीय प्रमाणपत्रे याची प्रत घेणं.

**हे टाळा** बालकाला अडचण वाटत असताना उपस्थितीचा आग्रह धरणं. वैद्यकीय अहवाल आणि वैद्यकीय प्रमाणपत्र घेण्यासाठी पैसे देणं.



# हे करा — गुन्ह्याचे घटना स्थळ आणि आरोपीची ओळख — हे टाळा

**हे करा** कारवाईच्या तारखा जाणून घेण्यासाठी तपास अधिकाऱ्याच्या संपर्कात राहणे. या सर्व कारवाई दरम्यान बालकासोबत राहणे.

**हे टाळा** गुन्ह्याच्या घटनास्थळी किंवा आरोपीची ओळख पटवण्यासाठी बालकाला एकटं जाऊ देऊ नये.

**हे करा** आरोपी किंवा तिच्या/त्याच्या नातेवाईकाकडून, आरोपीच्या हितचिंतकांकडून धमक्या आल्यास जवळच्या पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा (एनसी) नोंदवणे आणि या तक्रारीची प्रत पोलिसांकडून विनामूल्य घेणे.

**हे टाळा** आरोपी किंवा तिच्या / त्याच्या नातेवाईकाकडून येणाऱ्या धमक्यांकडं किंवा दबावाकडं दुर्लक्ष करणं.

**हे करा** तक्रार नोंदवल्यानंतर बालक आणि आरोपी एकमेकांच्या संपर्कात येणार नाहीत याची खबरदारी घेणं.

**हे टाळा** बालकाला आणि तुम्हाला आरोपीसोबत एकाच वाहनातून पोलिसांना रुग्णालय किंवा कोर्टात घेऊन जाऊ देणं.



## हे करा — कोर्टापुढे जबाब आणि पुरावा देणे — हे टाळा

**हे करा** — न्यायालयीन प्रक्रियेच्या सर्व तारखा पोलिसांकडून तुम्हाला आगाऊ कळतील हे पाहा. तक्रार नोंदवल्यापासून पोलिसांनी ९० दिवसात कोर्टात दोषारोपपत्र सादर केले आहे अथवा नाही, हे आवर्जून पाहा.

**हे टाळा** — पुरावे गोळा केल्यानंतर व जबाब दिल्यानंतर पोलिस अधिकाऱ्याशी असलेला संपर्क तोडून टाकणे.

**हे करा** — दंडाधिकाऱ्यासमोर तुमच्या बालकाच्या जबाबाचे ध्वनिमुद्रण केले जाताना उपस्थित राहा.

**हे टाळा** — कोर्टाने सांगितल्याशिवाय कोर्टातून बाहेर पडणे. तुमच्या सोबतीमुळं बालकाला धीर मिळणार असेल तर तुम्ही तशी परवानगी न्यायधीशांकडे मागू शकता.

**हे करा** — आरोपीच्या वकिलाकडून बालकाला थेट प्रश्न विचारले जाणार नाहीत, न्यायाधीशामार्फतच प्रश्न विचारले जावेत आणि न्यायधीशच प्रश्न विचारत आहे याची खात्री तुमचे वकील आणि/किंवा विशेष सरकारी वकील यांच्याकडून करुन घ्या.

**हे टाळा** — आरोपीच्या वकिलाला आणि त्याच्या सल्लागाराला तुमच्या बालकाला प्रश्न विचारू देणं.

**हे करा** — सुनावणीची गुप्तता आणि गोपनीयता जपण्याची पुरेशी खबरदारी पोलिस आणि दंडाधिकाऱ्यांनी घेतली आहे, याची खातरजमा करा.

**हे टाळा** — आरोपीसमोर बालकाला आणणं किंवा खटल्याचा तपशील खुल्या कोर्टात उघड करणं.



# हे करा बालकाला भरपाई आणि पुनर्वसन हे टाळा

**हे करा** तपास अधिकारी, स्थानिक स्वयंसेवी संस्था किंवा वकील यांच्याकडून बालकासाठीच्या भरपाई योजनेबद्दल माहिती घ्या.

**हे टाळा** बालकाला भरपाई आपसूक मिळेल किंवा मिळणारच नाही, हे गृहीत धरणं.

**हे करा** आघातातून बालकाला बाहेर काढण्यासाठी समुपदेशन चालू ठेवणं.

**हे टाळा** अचानकपणे समुपदेशन बंद करणे.

**हे करा** अत्याचाराच्या घटनेनंतर बालकाची नेहमीची दिनचर्या शक्य तितक्या लवकर पूर्ववत होईल याची काळजी घ्या.

**हे टाळा** घटनेनंतर विनाकारण बालकाला शाळेतून बाहेर काढणं किंवा समाजापासून तोडणं.

**हे करा** बालकाशी सतत बोलत राहा. तुमचं तिच्या/त्याच्या वर प्रेम आहे. आणि कुठल्याही प्रसंगात संरक्षण करण्यासाठी तुम्ही त्याच्या सोबत आहात असा विश्वास तिच्या/त्याच्या मनात निर्माण करा.

**हे टाळा** बालकाची दिनचर्या पूर्ववत झाली आहे, असं तुम्हाला वाटल्यानंतर बालकाच्या गरजांकडं दुर्लक्ष करणं.



हे करा

## विशेष अल्पवयीन पोलिस दलाची भूमिका

हे टाळा

बालकांच्या संरक्षणात पोलिस महत्त्वाची भूमिका बजावतात. पोक्सो कायदा २०१२ बाल लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाशी निगडित असताना बालकाच्या बाल-मैत्रीपूर्ण प्रक्रिया अवलंबण्याची आज्ञा देतो.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (डीएलएसए) कडून त्यांच्या संपर्कासाठीचा तपशील, बालकाला सर्व कायदेशीर मदत आणि वकील उपलब्ध करून घेण्याचा अधिकार बालकाला आहे. पोक्सो कायदा, २०१२ कलम ४० आणि नियम ४ (२)

- खासगी आणि सरकारी आरोग्य सेवा आणि संकटकालीन उपयांची उपलब्धता बालकाला करुन देणं.
- खटल्याच्या सर्व प्रक्रियांची माहिती देणं.
- तपास कुठवर आला याची माहिती देणं.
- आरोपीची अटक, त्याच्या जामिनाची स्थिती याबाबत अवगत करणं
- दोषारोपपत्र सादर करणं
- कोर्टाच्या प्रक्रियेची तारीख, वेळ, ठिकाण आदी सविस्तर माहिती देणं
- न्यायाधीशांनी व्यक्त केलेली मतं आणि त्यांचा अर्थ सांगणं. भरपाई मिळवून देण्याची व्यवस्था करणं.

**हे करा** # पोलिसांसाठी महत्त्वाचे **हे टाळा**

## तक्रारीची नोंद करताना

**हे करा** बालकांवरील लैंगिक अत्याचाराची प्रत्येक तक्रार नोंदवून घ्यावी.

**हे टाळा** कोणत्याही कारणावरून तक्रार नोंदवून घेण्यास नकार देणे.

**हे करा** बालक व त्याच्या कुटुंबीयांवर विश्वास दाखवा. बालकाचा धर्म, वर्ण, जात, लिंग किंवा जन्माचे ठिकाण अशा कोणत्याही मुद्यावरून भेदभाव न करता संवेदनशील राहा.

**हे टाळा** बालक व त्याच्या त्याच्या कुटुंबीयांबद्दल साशंक राहून निर्णय करणे टाळा. अत्याचाराच्या घटनेबद्दल बालकाला किंवा त्यांच्या कुटबीयांनाच दोषी धरणं

**हे करा** तक्रारदाराकडून तपशीलवार, सविस्तर तक्रार नोंदवून घ्या.

**हे टाळा** तक्रार नोंदवण्यापूर्वीच बालकाकडून माहिती काढण किंवा त्याच्याशी बोलणं.

**हे करा** तक्रारीला आवक क्रमांक द्या, माहिती देणाऱ्याला तक्रार वाचून दाखवा आणि पोलिस दलाच्या रीतसर तक्रार वहीत (रेकॉर्ड) ती नोंदवून घ्या.

**हे टाळा** विशेष नोंद न करता, आवक क्रमांक न देता मोघमपणे तक्रार लिहून घेणं.

**हे करा** बालक स्वतःच तक्रारदार असेल तर त्याची तक्रार त्याला/तिला समजेल अशा सोप्या भाषेत लिहून घ्या.

**हे टाळा** बालकाला न समजणाऱ्या कायदेशीर भाषेत किंवा शब्दच्छल करणाऱ्या भाषेत तक्रार लिहिणं.

**हे करा** बालकाची भाषा समजत नसेल व त्याच्याशी संवाद साधण्यात अडचण येत असेल तर स्थानिक स्वयंसेवी संस्था किंवा तज्ज्ञाची मदत घ्या.

**हे टाळावे** तुमची भाषा बालकाला समजत नसतानाही, त्याला विशिष्ट मदतीची गरज असतानाही स्वतःच रेटून तक्रार लिहून घेणं.

## हे करावे — बालकाचे संरक्षण — हे टाळावे

**हे करावे** बालकाची देखभाल, संरक्षण व आरोग्यविषयक गरजा भागविण्याची सोय तातडीनं करणं, आवश्यकतेनुसार राहण्याची व्यवस्था करणं.

**हे टाळावे** बालकाच्या देखभाल-संरक्षणाकडं दुर्लक्ष करणं

**हे करा** बालकाची तक्रार आल्यापासून २४ तासांत स्थानिक बाल कल्याण समितीला त्या संदर्भात अवगत करून देणं

**हे टाळावे** बालकाच्या देखभाल-संरक्षणाची काळजी घेण्याबाबत महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या बाल कल्याण समितीला दाखल तक्रारीची माहिती न देणं.

**हे करा** विनामूल्य कायदेशीर साहाय्य आणि जिल्ह्यातील इतर आधार सेवांची माहिती बालकाला आणि कुटुंबीयांना देणं

**हे टाळावे** न्यायालयीन कार्यवाहीची माहिती आणि इतर उपलब्ध सेवांची माहिती बालकाला असेल असं गृहीत धरणं.

## याची खात्री करा...

- पोलिसांनी गणवेशात बालकासमोर न जाण्याची काळजी घ्यावी.
- माता-पिता किंवा पालकांना जबाब नोंदवण्याच्या तारखेची आगाऊ माहिती द्यावी.
- महिला पोलिस अधिकाऱ्यानेच पीडित बालकाला त्याच्या बोली भाषेत, त्याच्या कलाने जबाब नोंदवावा.

## वैद्यकीय अधिकाऱ्यांची भूमिका

लैंगिक गुन्हेगारीच्या अनेक प्रकरणांमध्ये पालक किंवा बालकांचे त्यांचे काळजीवाहक बालकांना पोलिसांकडं घेऊन जाण्याआधी अगदी जवळच्या रुग्णालयात किंवा दवाखाण्यात घेऊन जाण्यास प्राधान्य देतात. बालकाच्या जलद शारीरिक व मानसिक पुनर्वसनामध्ये आरोग्य व्यावसायिक आणि रुग्णालयाची भूमिका महत्त्वाची असते. लैंगिक अत्याचार करणाऱ्या व्यक्तीचे पुरावे वैद्यकीय तपासणी मध्ये POCSO च्या बहुतेक प्रकरणांमध्ये आढळतात.

लैंगिक अपराध नियम, २०१२ मधील बालकाच्या संरक्षणाचा नियम ५ अन्वये कोणतीही वैद्यकीय सुविधा मग ती खासगी किंवा सार्वजनिक असली तरी तत्परतेनं पीडितेला उपलब्ध करून देणं आवश्यक आहे. लैंगिक अत्याचार म्हणजे वैद्यकीय आणीबाणी आहे.

## वैद्यकीय व्यावसायिकांसाठीची कार्यपध्दत

**लैंगिक अत्याचार झालेल्या बालकाच्या वैद्यकीय तपासणी प्रक्रियेचा आढावा.**

- बालक/पालक/कुटुंबीयांची संमती घ्या
- प्रथमोपचार द्या
- सविस्तर पूर्वेतिहास जाणून घ्या.
- तपासणी वयाचे अनुमान - शारीरिक, दंतक, रेडिऑलॉजिकल
- पुराव्यांचं दस्तऐवजीकरण
- उपचार इजा -जखमांवर इलाज
- संसर्गजन्य लैंगिक रोगांची चाचणी
- एचआयव्ही एड्स
- संकटकालीन आरोग्य सेवा
- बालिकांच्या बाबतीत गर्भधारणा चाचणी
- युपीटी (आवश्यक असल्यास) समुपदेशन
- इतर आवश्यक सेवांची माहिती आणि संदर्भ
- बालकाला घरी सोडणं
- प्रकृतीचा आढावा

# ‘पोक्सो’ कायद्यानुसार कारवाई अशी होईल

## बाल लैंगिक अपराध घटना

स्थानिक पोलिसांना/बालकांसंबंधी विशेष पोलिस पथक यांच्याकडे तक्रार नोदवणे. कलम १९

चोवीस तासांच्या आत पोलिस/ बालकांसंबंधातील विशेष पोलिस पथक यांच्याकडे जबाब नोंदवणे.

- बालकाला आधार गृह किंवा जवळच्या रुग्णालयात दाखल करणे.
- महिला डॉक्टरकडून बालकाची वैद्यकीय तपासणी करणे.
- न्याय-दंडाधिकाऱ्याकडून बालकाचा जबाब नोंदवून घेणे.
- विशेष न्यायाद्वारे (बालक सुलभ) घटना घडल्यापासून एका वर्षाच्या आत सुनावणी पूर्ण झाली पाहिजे. कलम २८ आणि ३३

बालकल्याण समितीने, बालकाला आपल्या अधिकारानुसार बालकाला त्याच्या/तिच्या कुटुंबांच्या किंवा सामायिक अभिरक्षेतून बाहे काढण्याची किंवा निवारागृहात ठेवण्याची गरज आहे किंवा कसे यावर ३ दिवसांच्या आत निर्णय घेण्याची कार्यवाही करावी. कलम४ (४)

**नोंद - घटनेच्या परिस्थितीनुसार**

- कुटुंब, पालक किंवा सक्षम व्यक्तीकडं बालकाला पुन्हा सोपवणे.
- बालगृह किंवा आधार गृह कलम १९ (५)
- विधी समुपदेशन कलम ४०
- आधार देणारी व्यक्ती

- मध्यस्थ, अनुवादक, तज्ज्ञ व्यक्ती, विशेष शिक्षक किंवा दुभाषी विहित फी प्रदान करून बालकासाठी पुरवण्यात येईल. कलम १९ (४) व नियम ३ (७)
- तपास किंवा न्याय चौकशी दरम्यान बालकाची ओळख दाखवली जाणार नाही आणि साक्ष देण्याच्या वेळी बालकाला आरोपी न दिसण्याची काळजी घेणे. कलम ३३ (७) व नियम ३६

- अत्याचारग्रस्ताला भरपाई देणे नियम ७
- विशेष सरकारी अभियोक्ताकडून फिर्याद कलम ३२

# ‘पोक्सो’
# कोणाची काय जबाबदारी ?

| अधिकारी | कर्तव्य |
|---|---|
| पोलिस विशेष अल्पवयीन पोलिस दल | • माहितीची नोंद<br>• प्राथमिक चौकशी<br>• चोवीस तासांच्या आत विशेष न्यायालय / बालकल्याण समिति यांच्याकडे तक्रारीची नोंद<br>• आवश्यकतनुसार  बालकाला २४ तासांच्या आत बालकल्याण समितीपुढं हजर करणे, बालकाला वैद्यकीय सुविधा पुरवणे.<br>• मातापिता / पालक यांना खबर देणे.<br>• बालकाची काळजी घेणाऱ्या व्यक्तीची नेमणूक केल्याचे विशेष न्यायालयाला २४ तासांच्या आत कळविणे.<br>• कोणत्याही क्षणी आरोपी बालकाच्या संपर्कात येणार नाही याची खबरदारी घेणे. |
| बाल कल्याण समिती | •काळजी आणि संरक्षणाच्या दृष्टीनं बालकाला कुटुंब, बाल गृह,<br>•निवारा गृह इथं ठेवण्याचा निर्णय तिन दिवसांत घेणे.<br>•आधार देणारी व्यक्ती सोबत पाठवणे. |
| जिल्हा बाल संरक्षण दल | • गरजेनुसार अधिकाऱ्यांना दुभाषी, अनुवादक, विशेष शिक्षक मिळवून देणे.<br>• दुभाषी, अनुवादकाच्या सेवेची किंमत देणे. |
| दंडाधिकारी | • बालकाच्या घरी किंवा त्याला जिथं सोयीस्कर वाटेल अशा ठिकाणी बालकाचा जबाब नोंदवून घेणे.<br>• पोलिसाच्या चौकशीचा अंतिम अहवालाची प्रत बालकाला / पालकांना / प्रतिनिधीला देणे. |

# 'पोक्सो'

## गुन्हे आणि त्यासाठीच्या शिक्षा

| गुन्हे | सोप्या व्याख्या |
|---|---|
| लिंगप्रवेश अंतर्भूत असलेला लैंगिक अत्याचार (कलम ३ व ४) | एखादी व्यक्ती जर ज्याचे शिश्न बालकाच्या योनीत, मुखात, मूत्रमार्गात, गुदद्वारात कोणत्याही मर्यादेपर्यंत घालील किंवा बालकाला त्याच्याबरोबर किंवा इतर कोणत्याही व्यक्तीबरोबर तसे करावयास लावणे. |
| शिक्षा | किमान १० वर्षांपेक्षा जास्त कारावास की जो जन्मठेपेपर्यंत वाढवला जाऊ शकतो. आणि द्रव्य दंडास पात्र |
| कलम ४ (२) | जो कोणी १६ वर्षापर्यंतच्या बालकाविरुद्ध लिंगप्रवेश अंतर्भूत असलेला लैंगिक हमला करेल. |
| शिक्षा | २० वर्षेपेक्षा कमी नाही परंतु जास्तीत जास्त जन्मठेप (नैसर्गिक मृत्यूपर्यंत) दंडासह |
| लिंगप्रवेश अंतर्भूत असलेला गंभीर स्वरूपाचा लैंगिक अत्याचार (कलम ५ व ६) | विश्वास किंवा अधिकारपदावर असणाऱ्या व्यक्ती जशा की पोलिस अधिकारी किंवा संरक्षण दलाचे सदस्य किंवा लोकसेवक इत्यादींनी केलेले लिंगप्रवेश अंतर्भूत असलेला लैंगिक अत्याचार |
| शिक्षा | किमान २० वर्षांपेक्षा जास्त सक्तमजुरी की जो जन्मठेपेपर्यंत वाढवली जाऊ शकते. आणि द्रव्य दंडास पात्र किंवा मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद |
| लैंगिक अत्याचार (कलम ७ व ८) | शारीरिक स्पर्शाचा अंतर्भाव.<br>उदाहरणार्थः अश्लील चित्रं दाखवणे, बालकाच्या गुप्त अवयवांना स्पर्श करणे किंवा बालकाला दुसऱ्याच्या गुप्त अवयवांना स्पर्श करण्यास भाग पाडणे इत्यादी |
| शिक्षा | किमान ३ वर्षांपेक्षा जास्त कारावास की जो पाच वर्षांपर्यंत वाढवला जाऊ शकतो. आणि द्रव्य दंडास पात्र |
| वाढीव लैंगिक अत्याचार (कलम ९ व १०) | सत्तेत, विश्वास किंवा अधिकारपदावर असणाऱ्या व्यक्तींनी केलेले लैंगिक अत्याचार |
| शिक्षा | किमान पाच वर्षांपेक्षा जास्त कारावास की जो सात वर्षांपर्यंत वाढवला जाऊ शकतो. आणि द्रव्य दंडास पात्र |

# 'पोक्सो'

## गुन्हे आणि त्यासाठीच्या शिक्षा

| गुन्हे | सोप्या व्याख्या |
|---|---|
| लैंगिक छळ (कलम ११ व १२) | **लैंगिक उद्देश ठेवून एखाद्या व्यक्तीने बालकावर लादलेला लैंगिक छळ :**<br>● लैंगिक अर्थ बाळगून केलेली कोणतीही कृती.<br>● बालकाला त्याचे शरीर दाखवण्यास भाग पाडणे.<br>● संभोग वर्णपर उद्देशाने बालकाला कोणतीही वस्तू किंवा माध्यम दाखवणे<br>● बालकाचा थेट किंवा इलेक्ट्रॉनिक-डिजिटल माध्यमातून वारंवार किंवा सातत्यानं पाठलाग करणे, त्याला न्याहाळणं किंवा संपर्क साधणे<br>संभोग वर्णपर उद्देशानं बालकाला प्रेरित करणे किंवा नंतर त्याला आमिष दाखविणे. |
| **शिक्षा** | **कारावास की ३ वर्षांपर्यंत वाढवला जाऊ शकतो.** |
| पोर्नोग्राफीचे उद्देश (कलम१३ , १४ व १५) | ● पोर्नोग्राफीसाठी मुलाचा वापर<br>● पोर्नोग्राफीच्या उद्देशानं मुलाचा वापर, बाल पोर्नोग्राफी कृत्यां -मध्ये त्याचा थेट सहभाग आणि कलम ३ अन्वये अत्याचार<br>● पोर्नोग्राफीच्या उद्देशाने मुलाचा वापर, बाल पोर्नोग्राफी कृत्यांमध्ये त्याचा थेट सहभाग, कलम ५ अन्वये अत्याचार<br>● पोर्नोग्राफीच्या उद्देशानं मुलाचा वापर, बाल पोर्नोग्राफी कृत्यांमध्ये त्याचा थेट सहभाग, कलम ७ अन्वये अत्याचार<br>● पोर्नोग्राफीच्या उद्देशानं मुलाचा वापर, बाल पोर्नोग्राफी कृत्यांमध्ये त्याचा थेट सहभाग, कलम ९ अन्वये अत्याचार<br>● बाल पोर्नोग्राफी साहित्याचा साठा करणं कलम १५ |
| **शिक्षा** | **● ५ वर्षे तुरुंगवास आणि दंडास पात्र. परंतु दुसऱ्यांदा किंवा वारंवार त्याच गुन्हात दोषी आढळल्यास दहा वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडास पात्र**<br>**● किमान १० वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवास की जो जन्मठेपेपर्यंत वाढू शकतो आणि द्रव्य दंडास पात्र** |

# 'पोक्सो' गुन्हे आणि त्यासाठीच्या शिक्षा

| गुन्हे | सोप्या व्याख्या |
|---|---|
| शिक्षा | ● ५ वर्षे तुरुंगवास आणि दंडास पात्र. परंतु दुसऱ्यांदा किंवा वारंवार त्याच गुन्ह्यात दोषी आढळल्यास दहा वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडास पात्र<br>● किमान १० वर्षंपेक्षा जास्त तुरुंगवास की जो जन्मठेपेपर्यंत वाढू शकतो आणि दंडास पात्र<br>● २० वर्षांपेक्षा जास्त कारावास की जो जन्मठेपेपर्यंत वाढू शकतो आणि दंडास किंवा मृत्युदंड<br>● किमान ३ वर्षे तुरुंगवास की जो ५ वर्षांपर्यंत वाढू शकतो व दंडास पात्र<br>● किमान ५ वर्षे तुरुंगवास की जो दहा वर्षांपर्यंत वाढू शकतो व दंडास पात्र<br>● तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंड किंवा दोन्ही |
| उत्तेजन (कलम१६ व १७) | जाणीवपूर्वक भडकवणे. कोणत्याही पद्धतीनं मदत करणे किंवा दुसऱ्याबरोबर कटात सहभागी होणे. |
| शिक्षा | गुन्ह्याइतकीच शिक्षा |
| प्रयत्न (कलम१८) | कोणताही गुन्हा पूर्णत्त्वास नेण्याच्या दृष्टीनं केलेला प्रयत्न |
| शिक्षा | अर्धी जन्मठेप किंवा संबंधित गुन्ह्यासाठी लागू असलेल्या दीर्घ तुरुंगवासाच्या निम्मा तुरुंगवास आणि दंडास पात्र किंवा दोन्ही |
| कलम १९,२०,२१ | बालकाच्या संदर्भात लैंगिक अत्याचार या अधिनियमाखाली अपराध घडला असल्यास त्याची माहिती विनाविलंब विशेष बालन्याय पोलीस युनिट व स्थानिक पोलिसांना देण्यात यावी. |
| शिक्षा | सहा महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. |
| माध्यमांची जबाबदारी (कलम २३) | अत्याचारग्रस्ताची ओळख उघड केल्यास किंवा गुन्ह्याची माहिती पोलिसांना देण्यात अपयश आल्यास. |
| शिक्षा | सहा महिने ते एक वर्ष तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही |
| खोटी माहिती किंवा तक्रार (कलम२२) | बालक सोडून जो कोणी खोटी माहिती देईल किंवा खोटी तक्रार देईल |
| शिक्षा | ६ महिने तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही कलम २२(१)<br>एक वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही कलम २२ (४) |
| गुन्ह्याची नोंद करण्यात किंवा तक्रार देण्यात अपयश (कलम २१) | पॉक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात किंवा तक्रार देण्यात अपयश आल्यास |
| शिक्षा | ६ महिने ते एक वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही कलम २१(१)<br>एक वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड कलम २२ (२) |

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# बाल हक्क जाणीव व सामाजिक कर्तव्य


## कुटुंबाधिष्ठित पर्याय

- दत्तक विधान
- कौटुंबिक अर्थ साहाय्यक
- पाळणाघर
- स्पॉनरशिप
- बालसंगोपन योजना
- डे केअर सेंटर
- बालसमुपदेशन केंद्र
- पारिपालक
- समुपदेशन केंद्र
- शैक्षणिक साहाय्य

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल



# बुलडाणा जिल्हा पोलीस दल



- पोलीस नियंत्रण कक्ष बुलडाणा : 07262-242400
- सायबर पो. स्टेशन : 07262-247767
- महिला तक्रार : 8698000011

| ज्येष्ठ नागरीक हेल्प | चाईल्ड हेल्पलाईन | महिला हेल्पलाईन |
|---|---|---|
| 1090 | 1098 | 1091 |

मुद्रणस्थळ : ओंकार ग्राफिक्स ॲण्ड पब्लिकेशन, जालना. मो.९८२२०७५०२६